मुंबई । मुंबई उपनगर । नवी मुंबई । ठाणे । रायगड । पालघर । पुणे । नाशिक जिल्ह्यात एकाच वेळी वितरीत होणारे दैनिक ■ Epaper-bittambatami.com ■ बित्तंबातमी/bittambatmi■ bittambatmi@gmail.com ■ https://twitter.com/bittambatami

# बित्तंबातमी!

ठाणे | गुरुवार, १४ मार्च २०२४ | वर्ष | ४१ | अंक | १८१ | पाने | ६ | मूल्य ३ रुपये

## थोडक्यात

### वेल्हे तालुक्याचे नाव आता 'राजगड'

पुणे जिल्ह्याच्या वेल्हे तालुक्यात राजगड, तोरणासारखे महत्वाचे ऐतिहासिक किल्ले आहेत. वेल्हे तालुक्यातल्या ज्या राजगड किल्ल्यावरुन छत्रपती शिवाजी महाराजांनी २७ वर्षे स्वराज्याचा कारभार केला, त्या ऐतिहासिक राजगड किल्ल्याचे, स्वराज्याच्या पहिल्या राजधानीचे नाव वेल्हे तालुक्याला देण्याचा निर्णय राज्य मंत्रिमंडळाच्या माध्यमातून आज घेता आला. वेल्हे तालुका आणि पुणे जिल्हावासियांची इच्छा पूर्ण करता आली, याचा मनापासून आनंद आहे, अशी प्रतिक्रिया उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी व्यक्त केली आहे.

### नगर दक्षिण लोकसभेसाठी ६०० मराठा उमेदवार !

अहमदनगर : सकल मराठा समाजाच्या वतीने अहमदनगर दक्षिण लोकसभा मतदार संघात लोकसभेसाठी सातशे ते आठशे मराठा उमेदवार अर्ज दाखल करण्यात येणार असल्याची माहिती मराठा समन्वयक राम जरांगे यांनी दिली आहे. त्या संदर्भात तयारी सुरू असल्याचं देखील त्यांनी सांगितलं आहे. तर आत्तापर्यंत पाचशे जणांची तयारी झाल्याचं बोललं जातं आहे. आतापर्यंत सर्वाधिकार जामखेड येथे १०४ जणांनी लोकसभा निवडणूक लढण्याची तयारी दाखवली आहे. तर श्रीगोंदा ३८, कर्जत १२, नगर तालुका ५४, नगर शहर ५५, पाथर्डी ४८, पारनेर २९ जणांनी निवडणूक लढण्याची तयारी केली आहे. विशेष म्हणजे स्वतः डिपॉझिट भरून हे उमेदवार उभे राहणार असल्याचे राम जरांगे यांनी सांगितलं आहे.

# गडकरींसह पंकजा, मुनगंटीवारही लोकसभेची निवडणूक लढवणार

## भाजपची महाराष्ट्रातील २० उमेदवारींची यादी जाहीर

नवी दिल्ली :

लोकसभेसाठी भारतीय जनता पार्टीने दुसरी यादी जाहिर करताना महाराष्ट्रात तगडे उमेदवार ऊभे केले आहेत. दुसऱ्या यादीत केंद्रीय मंत्री नितीन गडकरीसह बीडमधून पंकजा मुंडे तर चंद्रपुरमधून सुधीर मुनगंटीवार असे बढे नेते लोकसभेची निवडणूक लढविणार आहेत. एकनाथ खडसे यांनी बंड केल्यानंतरही त्यांची सुन रक्षा खडसेला रावेरमधून तिकीट देण्यात आले आहे. आजच्या यादीमध्ये महाराष्ट्रातील एकूण २० उमेदवारांचा समावेश.



भाजपने महाराष्ट्रातील अनेक दिग्गजांना डच्चू दिला आहे. यात भाजपचे उत्तर मुंबईचे खासदार गोपाळ शेट्टींच्या एवेजी पियूष गोयल यांना उमेदवारी देण्यात आली आहे. याशिवाय बीडमधून प्रीम मुंडेएवेजी बहिण पंकजा मुंडे, मुंबई उत्तर पूर्व जागेसाठी मनोज कोटक एवेजी आमदार मिहीर कोटेचा. जळगावमध्ये उन्मेष पाटील एवेजी स्मिता वाघ तर अकोल्यात संजय धोत्रेऐवजी त्यांचा मुलगा अनुप धोत्रेंना तिकीट दिलं आहे.

### भाजपची यादी जाहीर

१) चंद्रपूर- सुधीर मुनगंटीवार,
२) रावेर - रक्षा खडसे
३) जालना- रावसाहेब दानवे
४) बीड पंकजा मुंडे
५) पुणे- मुरलीधर मोहोळ
६) सांगली - संजयकाका पाटील
७) माढा- रणजीत निंबाळकर
८) धुळे - सुभाष भामरे
९) उत्तर मुंबई- पियुष गोयल
१०) उत्तर पूर्व- मिहीर कोटेचा
११) नांदेड- प्रतापराव चिखलीकर
१२) अहमदनगर- सुजय विखे पाटील
१३) लातूर- सुधाकर श्रृंगारे
१४) जळगाव- स्मिता वाघ
१५) दिंडोरी- भारती पवार
१६) भिवंडी- कपिल पाटील
१७) वर्धा - रामदास तडस
१८) नागपूर- नितीन गडकरी
१९) अकोला- अनुप धोत्रे
२०) नंदुरबार- डॉ. हिना गावित

# महिलांना लखपती करणार; राहुल गांधींचे जाहीर वचन



मालेगाव :

काँग्रेस नेते राहुल गांधींची भारत जोडो न्याय यात्रा महाराष्ट्रात दाखल झाली आहे. आज धुळ्यात महिलांसाठी विविध घोषणांचा काँग्रेसचा वचननामाच जणू त्यांना जाहिर केला. काँग्रेस सत्तेत आल्यास भारतातील प्रत्येक गरीब महिलेला आम्ही लखपती करू अशी घोषणा त्यांनी केली.गरीब महिलांसाठी आम्ही बँक खात्यात १ लाख रुपये वर्षाला देणार आहोत. नरेंद्र मोदी जर करोडपतींचे कर्ज माफ करणार असेल तर आम्ही गरिबांचे करणार आहोत, असे राहुल गांधींनी म्हटले आहे.

### काँग्रेसकडून महिलांसाठी पाच मोठ्या घोषणा

मोदींनी मोठ्या धूम धडाक्यात महिला आरक्षण दिले. फटाके फोडले नाचले आणि सांगितले गेले की, सर्वे पूर्ण झाल्यावर तुम्हाला आरक्षण देणार असे म्हणण्यात आले. काँग्रेसचे सरकार आल्यावर लगेच आरक्षण देणार. कोणत्याही सर्वेक्षणाची गरज नाही. सगळ्या गरीब महिलांना सरळ बँक अकाऊंटमध्ये एक लाख रुपये देणार. सरकारी नोकरीमध्ये महिलांना ५० टक्के आरक्षण देणार. आशा अंगणवाडीमध्ये काम करणाऱ्या महिलांना केंद्र सरकारची भागीदारी दुप्पट करणार. सावित्री बाई फुले यांच्या नावाने नोकरी करणाऱ्या महिलांसाठी हॉस्टेल उघडणार. प्रत्येक जिल्ह्यात हे हॉस्टेल उघडण्यात येणार आहे, अशा घोषणा काँग्रेसकडून धुळे येथे झालेल्या महिला मेळाव्यात करण्यात आल्या. धुळ्यानंतर मालेगावमध्ये राहुल गांधी यांचा भव्य रोड शो आयोजित करण्यात आला होता.

# पनवेलमधिल विकास कामांची बिले भलत्याच व्यक्तीला अदा!

## सीईओ सत्यजित बडेंचे चौकशीचे आदेश

अशोक गायकवाड



अलिबाग : पनवेल तालुक्यातील ६ ग्रामपंचायत हद्दीत जिल्हा परिषदेच्या स्वनिधीतून मंजूर करण्यात आलेला कामांची बिले त्या कामाशी संबध नसणाऱ्या भलत्याच व्यक्तीला अदा करण्यात आल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. याबाबतच्या तक्रारीची मुख्य कार्यकारी अधिकारी (प्रभारी) सत्यजित बडे यांनी गंभीर दखल घेतली असून चौकशी करण्याचे आदेश दिले आहे.

जिल्हा परिषद सार्वजनिक बांधकाम कंत्राटदार संघटना पनवेल अध्यक्ष नीलेश म्हात्रे यांनी याबाबत भ्रष्टाचार झाल्याची तक्रार जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे केली होती. या तक्रारीत तथ्य आढळल्यास गुन्हा दाखल करण्याचे बांधकाम विभागाला बडे यांनी आदेश दिले आहेत.

पनवेल तालुक्यातील उसर्ली, नेरेपाडा, शिवकर, खेरवाडी, कोळघे या ग्रामपंचायत रस्त्यांची तर पालीदेवद ग्रामपंचायतीत संरक्षण भिंत बांधण्याचे काम जिल्हा परिषदेच्या स्व निधीतून मंजूर करण्यात आले होते. या कामांची बिले भलत्याच व्यक्तीच्या बँक खात्यात जमा करण्यात आल्याचा आरोप नीलेश म्हात्रे केला आहे. तक्रारीचे गांभीर्य लक्षात घेत मुख्य कार्यकारी अधिकारी सत्यजित बडे यांनी तत्काळ या प्रकरणी चौकशी करण्याचे आदेश बांधकाम विभागाला दिले आहेत. चौकशीचे आदेश मिळताच बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता प्रसन्नजीत राऊत यांनी वरील कामांची व अदा करण्यात आलेल्या बिलांची चौकशी हाती घेतली आहे.

# अजित पवारांनी सभ्यतेची नीच पातळी गाठली-शिवतारे



पुणे :

शिंदे गटाचे माजी आमदार विजय शिवतारे यांनी पवार कुटुंबीयांविरोधात आघाडी उभारत आज लोकसभेचे रणशिंग फुंकले. अजित पवारांनी सभ्येतेची नीच पातळी गाठली असल्यामुळे ते देतील त्या उमेदवाराविरोधात मी अपक्ष म्हणून उभा रहाणार असे त्यांनी आज पत्रकार परिषद घेऊन जाहिर केले. त्यांच्या या घोषणेने महायुतीत अस्वस्थता पसरली असून राष्ट्रवादी अजित पवार गट आक्रमक झाले आहेत. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी याची गंभीर दखल घेत शिवतारे यांना फोन करून सबुरीचा सल्ला दिल्याचे सुत्राकंडून कळते. तसेच उद्या वर्षा निवासस्थानी त्यांना बैठकीसाठी बोलावले आहे.

अजित पवारांनी सभ्यतेची सगळी नीच पातळी गाठली. मी २३ दिवस आजारी होतो, मला बायपास करायला सांगितली, मी नाही केली. स्टेन टाकल्या फेल झालं. मी संपूर्ण प्रचार ॲम्बुलन्समधून केला. अशावेळी अजित पवार यांनी माझी खिल्ली उडवली होती. ₹मरायला लागलेला आहे, तर कशाला निवडणूक लढवतोय. असे म्हणाले होते. तक्या खालच्या थराला अजित पवार आले. तू पुढे कसा निवडून येतो, तेच मी पाहतो. महाराष्ट्राभरात मी कोणाला पाडायचं ठरवलं, तर मी कोणाच्या बापाला घाबरत नाही आणि पाडतो म्हणजे पाडतोच, असंही ते म्हणाले होते.

# अहमदनगर शहराचे नामकरण 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी नगर'

मुंबई :

लोकसभेची आचार संहिता लागू होण्याआधी मुख्यमंत्री एकनाथ शिंदेच्या कॅबिनेटने निर्णयांचा धडाका उडवला आहे. गेल्या ४८ तासात ४५ मोठे निर्णय त्यात घेतले असून आता अहमदनगर शहराचे नाव 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी नगर' असे बदलण्या आले आहे. मुंबईतील ८ रेल्वेस्थानकांचंही नामांतर करण्यात आले आहे.

यापूर्वी ११ मार्चला झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत राज्य सरकारने १८ महत्त्वाचे निर्णय घेतले होते. त्यानंतर अवघ्या ४८ तासांमध्ये राज्य सरकारने आणखी २६ महत्त्वाचे निर्णय घेतले आहेत.

